


**कोल्हापूर : अभिनेत्री करिश्मा कपूर यांच्या हस्ते चेअरमन संजय घोडावत आणि दर्शन घोडावत यांना 'ग्लोब ऑयल यंग आंत्रप्रनर' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शेजारी उपस्थित परवेझ कादर.**

# संजय घोडावत यांना 'ग्लोब ऑयल यंग आंत्रप्रनर' पुरस्कार

**कोल्हापूर :** खाद्यतेलाचे उत्पादन करणाऱ्या घोडावत फुडस् इंडिया कंपनीने अतुलनीय कामगिरी केल्याबद्दल 'ग्लोब ऑयल यंग आंत्रप्रनर' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अभिनेत्री करिश्मा कपूर आणि लिबर्टी ऑईल मिल्सचे मुख्य कार्यकारी संचालक परवेझ कादर यांच्या हस्ते चेअरमन संजय घोडावत आणि दर्शन घोडावत यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी दिनेश सहारा, रुची न्हाया, गोदरेज उद्योग समूहाचे चेअरमन आदी गोदरेज, संदीप बजोरिया, गायक सोनू निगम आदी उपस्थित होते. खाद्यतेल उद्योग क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या उद्योजकांचा ग्लोब ऑईल संस्थेतर्फे सत्कार केला जातो. घोडावत फुडस्चे महाराष्ट्रात दोन ठिकाणी प्लॅन्टस् कार्यरत आहेत. चिप्री, कोल्हापूर आणि प्लॅन्ट गंगाखेड, परभणी येथे आहे. कोल्हापूर प्लॅन्टची रिफायनिंग क्षमता १०० एमटी प्रतिदिन असून सोयाबीन, कापसाच्या बिया व सूर्यफुल यापासून तेलाचे उत्पादन घेतले जाते. कंपनीची उत्पादने जगभर पोहोचविण्याचा मानस घोडावत यांचा आहे.